# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.08.2025** **वारःशुक्रवार**

---

1. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं उद्या पंतप्रधानांच्या हस्ते होणार वितरण
2. बँकिंग कायदा सुधारणा अधिनियम 2025 आजपासून लागू
3. बिहारमध्ये पुनरीक्षण मोहिमे अंतर्गत तयार केलेली प्रारूप मतदार यादी आज निवडणूक आयोग प्रकाशित करणार आणि
4. ओव्हल क्रिकेट कसोटीमध्ये पहिल्या दिवस अखेर भारताच्या 6 गडी बाद 204 धावा

**<u>किसान सन्मान</u>**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या होणार आहे. पंतप्रधान उद्या उत्तर प्रदेशातील वाराणसीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. यावेळी प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत नऊ कोटी 70 लाख शेतकऱ्यांना 20 हजार 500 कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित केली जाईल. उत्तर प्रदेशातील 2000 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू झारखंडच्या दौऱ्यावर आहेत. आज त्या भारतीय तंत्रज्ञान संस्था-भारतीय खनिकर्म विद्यालयाच्या ४५व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत. या संस्थेच्या अटल नावोन्मेश केंद्रामध्ये भरवण्यात आलेल्या प्रदर्शनालाही राष्ट्रपती भेट देतील. दीक्षांत सोहळ्यात पंतप्रधानांचे प्रधान सचिव पी के मिश्रा यांना राष्ट्रपतींच्या हस्ते डॉक्टर ऑफ सायन्सनं सन्मानित केलं जाणार आहे.

**<u>रेल्वेमार्ग</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीनं काल रेल्वे मंत्रालयाच्या 4 प्रकल्पांना मान्यता दिली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर- परभणी मार्गाचं दुहेरीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. तसंच इटारसी-नागपूर मार्गावर 4 थी मार्गिका वाढवण्यात येणार आहे. या चार प्रकल्पांसाठी सुमारे 11 हजार 169 कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. या प्रकल्पांबद्दल बोलतांना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले...

**छत्रपति संभाजी नगर के से लेके परभनी तक 177 किलोमीटर की सिंगल लाइन है। उसकी डबलिंग का प्रपोजल आज अप्रूव हुआ है 2179 करोड रुपीस के लिए और जो इस आरिया में कई सारी इंडस्ट्रीज है और**

**खासकर मराठवाड़ा में जहाँ इंडस्ट्रियल ग्रोथ की जरूरत है कई । स्मॉल एंड मीडियम इंडस्ट्रीज हैं जिनको पोर्ट से कनेक्टिविटी चाहिए तो आपको ध्यान होगा कुछ समय पहले जालना जलगांव प्रोजेक्ट भी एक सैंक्शन किया था। वैसा ही ये इम्पोर्टेंट प्रोजेक्ट से प्रोजेक्ट है जो जालना के ड्राई पोर्ट को कनेक्ट करता है और काफी सारे जो मराठवाड़ा के क्षेत्र हैं इंडस्ट्रियल एरियाज है उसको कनेक्ट करते है।**

प्रधानमंत्री कृषी संपदा योजनेसाठी सुमारे साडे 6 हजार कोटी रुपये आणि National Cooperative Development Corporation ला 2 हजार कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णयही केंद्रीय मंत्रीमंडळानं काल घेतला.

**बँकिंग कायदे**

बँकिंग क्षेत्रातील प्रशासनात सुधारणा आणण्यासाठी तसंच ठेवीदार आणि गुंतवणूकदारांना अधिकाधिक संरक्षण देण्याच्या उद्देशानं बँकिंग कायदा सुधारणा अधिनियम 2025 आजपासून लागू होत आहे. हा कायदा यावर्षी 15 एप्रिलला अधिसूचित करण्यात आला होता. सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांमध्ये लेखापरीक्षणाची गुणवत्ता वाढवणं आणि सहकारी बँकांतील अध्यक्ष आणि पूर्णवेळ संचालकांव्यतिरिक्त इतर संचालकांच्या कार्यकाळात वाढ करण्याची तरतूद यात आहे, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. त्याशिवाय यात व्याजाची मर्यादा पाच लाखांवरून दोन कोटी रूपयांपर्यंत करण्यात आली आहे.

**ईव्हीएम**

महाराष्ट्र विधानसभेच्या 2024च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर करण्यात आलेल्या ईव्हीएम तपासणी आणि पडताळणी प्रक्रियेत सर्व यंत्रं योग्य स्थितीत असल्याचं भारत निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. 10 उमेदवारांच्या विनंतीनंतर भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी 10 विधानसभा मतदारसंघांमधील मतदार युनिट, नियंत्रण यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांची तपासणी केली. सर्व यंत्रांनी चाचण्या उत्तीर्ण केल्या असून ईव्हीएममध्ये कोणत्याही प्रकारे छेडछाड करता येत नाही, हे सिद्ध झालं; त्यामुळे निकालांबाबत शंका घेण्याचं कारण नाही, असं भारत निवडणूक आयोगानं एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितलं आहे.

**मालेगाव बॉम्बस्फोट**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व सात आरोपींची काल राष्ट्रीय तपास संस्थेच्या विशेष न्यायालयानं सबळ पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. माजी खासदार प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित तसंच निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा यामध्ये समावेश आहे. मालेगावमध्ये 2008 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात 6 जणांचा मृत्यू झाला होता; तर 100 हून अधिक जण जखमी झाले होते. दहशतवाद विरोधी पथकानं प्राथमिक तपास केल्यानंतर हा तपास एनआयएकडे सोपवण्यात आला होता.

**फडणवीस**

भारताला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचं उद्दीष्ट पूर्ण करण्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे; राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याच्या दिशेने राज्य वेगाने वाटचाल करत असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेच्या इन्व्हेस्टमेंट सोल्युशनचे

उपाध्यक्ष अजय कुमार पांडे यांच्या समवेत मुंबईत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री काल बोलत होते. 2047 पर्यंत विकसित महाराष्ट्राचं स्वप्न साकारण्यासाठी आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेनं सहकार्य करावं असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<u>बिहार-पुनर्निरीक्षण</u>**

बिहारमध्ये मतदार यादी पुनरीक्षण मोहिमे अंतर्गत तयार केलेली प्रारूप मतदार यादी आज निवडणूक आयोग प्रकाशित करणार आहेत. बिहारमधील सर्व 38 जिल्ह्यांमधील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना मतदार यादीची प्रत्यक्ष आणि डिजीटल प्रत देण्यात येईल असं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं. बिहारचे मुख्य निवडणूक अधिकारी, 243 निवडणूक अधिकारी तसंच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना या प्रारूप मतदार यादीवर आक्षेप आक्षेप नोंदवता येतील. आजपासून 1 सप्टेंबरपर्यंतच्या महिन्याभराच्या काळात हे आक्षेप नोंदवता येणार असल्याचं ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं.

**<u>मस्क-सॅटेलाईट</u>**

एलॉन मस्क यांच्या स्टार लिंक या कंपनीला भारतात सॅटेलाईट इंटरनेट सेवा सुरू करण्याचा परवाना मिळाला असून, स्पेक्ट्रम वाटपासाठी आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल दिली. मोबाईल फोन सेवेला तीस वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त दिल्लीत आयोजित मोबाईल परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. गेल्या 11 वर्षातला भारताचा डिजीटल क्षेत्रातील प्रवास विलक्षण असल्याचं ते म्हणाले. गेल्या दशकभरात दुर्गम गावांपासून महानगरांपर्यंत पोचलेल्या डिजीटल सेवांमुळे नागरीक अधिक सक्षम झाले आहेत. परवडणाऱ्या आणि सर्वसमावेशक तंत्रज्ञानात जागतिक स्तरावर भारत आघाडीवर आहे असंही ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले.

**<u>टिळक पुण्यतिथी</u>**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराचं आज पुण्यात वितरण होणार आहे; ज्येष्ठ नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**<u>अण्णाभाऊ साठे जयंती</u>**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना महाराष्ट्रासह देशात विविध ठिकाणी अभिवादन करण्यात येत आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या साहित्याचे पाच सहा आणि सात असे तीन खंड मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज पुण्यात प्रकाशित होणार आहेत.

**<u>मकाऊ बँडमिंटन</u>**

मकाऊ खुल्या बँडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. पुरूष एकेरीत तरुण मन्नेपल्लीने हाँगकाँगच्या प्रतिस्पर्ध्यावर मात करत रोमांचक विजय मिळवला. तर लक्ष्य सेननं देखील इंडोनेशियाच्या खेळाडूवर 21-14, 14-21, 21-17 असा विजय मिळवत अंतिम आठमध्ये प्रवेश निश्चित केला.

या दोघांचा सामना आज चीनच्या प्रतिस्पर्ध्यांशी होणार आहे. पुरूष दुहेरीत, भारताच्या अव्वल सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी जपानच्या जोडीचा 10-21, 22-20, 21-16 असा पराभव केला. आज उपांत्यपूर्व फेरीत त्यांची गाठ मलेशियन जोडीशी पडणार आहे. आयुष शेट्टीचा पराभव झाल्याने तो स्पर्धेबाहेर पडला.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचवा सामना कालपासून लंडनच्या ओव्हल मैदानावर सुरु झाला. या मालिकेत सलग पाचव्यांदा नाणेफेकीचा कौल यजमान संघाच्या बाजूने लागला; आणि त्यांनी भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं; भारताच्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. काल दिवसअखेर भारताच्या 6 गडी बाद 204 धावा झाल्या होत्या. करूण नायरनं अर्धशतकी खेळी करत भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला; आज नायर आणि सुंदर भारताचा डाव पुढे सुरु करतील. या सामन्यात भारतानं गोलंदाज आकाशदीप आणि प्रसिद्ध कृष्णा यांना संघात स्थान दिलं आहे.

**हवामान**

बिहार, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश, झारखंड आणि सिक्कीममध्ये आज अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. जम्मू काश्मीर, लडाख, आणि ओडिशामध्येही विजांसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान येत्या महिनाभरात देशात बहुतांश ठिकाणी सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागाचे महासंचालक एम. महापात्रा यांनी सांगितलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.